# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - <u>घोषणा</u> -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दि. १२ जानेवारी, २०१९** रोजी घेण्यात आलेल्या **सहायक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशासकीय सेवा, गट-अ-२०१८** या चाळणी परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी उमेदवारांना हरकती / अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्विकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती / अभिवेदने विहित नमुन्यात परीक्षा नियंत्रक व सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, **५$^{१/२}$, ७ व ८** वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, मर्हषि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०००२१' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दि.२८ जानेवारी, २०१९** पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच / अभिवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती / अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक** : १९ जानेवारी, २०१९
**ठिकाण** : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सह सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई.